दोंडाईचा वरवाडे नगर परिषद कार्यालय,दोंडाईवा
जा.क्र. 832 /बांधकाम/२०१२-२०१३
दिनांक 1 MAR 2013

~~सुधारीत~~
बांधकाम परवानगी

विषय : बांधकाम परवानगी देणे बाबत....
संदर्भ : आपला अर्ज व नकाशे दिनांक - -२०१

(बांधकाम परवानगीची मुदत दिनांक) ११/०३/२०१३ ते दिनांक १०/०३/२०१४ पर्यंत)
श्री/श्रीमती धनलाल कांतीलाल जैन व प्रदिप शांतीलाल जैन
दोंडाईचा वरवाडे यांना गट क्रमांक/सि.स.क्र. ३२८/३ ~~प्लॉट क्र.मध्ये वाणिज्यिक प्रयोजनार्थ~~
मंजुर आराखड्या प्रमाणे. चे बांधकाम ~~देण्यांत येत आहे.~~ करीता
(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९,१९१,१९३,२०२,२०७)व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम१९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र विकास योजना नियम १९६८ चा नियम ६ व ७ अन्वये आणि त्या खालील नियमावलीस अनुसरुन खालील
अटीवर परवानगी देण्यांत येत आहे.

सदड
२५५/23/3V
२०१५

शर्ती :-
१. ह्या परवानगीची मुदत दिलेल्या तारखेपासून ~~एक वर्षापर्यंतच~~ राहील. त्यामुदतीत बांधकाम झाले पाहिजे. मुदत संपल्यानंतर मुदत वाढीचा अर्ज न दिल्यास हि परवानगी रद्द होईल व ही मुदतवाढ १.वर्षाची राहिल. त्यानंतर पुन्हा नवीन प्रकरण करावे लागेल.
२. ही परवानगी ज्या हेतुसाठी आहे त्यासाठीच तिचा वापर केला पाहिजे.
३. सर्व बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे करणे आवश्यक आहे. त्यात काही फेरबदल करावयाचा असल्यास करण्यापुर्वी तशी नगरपरिषदेची लेखी परवागनी घेतली पाहिजे.
४. मंजुर नकाशाची प्रत कामाच्या जागेवर बांधकाम तपासणीसाठी सदैव उपलब्ध असले पाहिजे.
५. बांधकामाचे साहित्य तसेच खोदकामातील माती, मुरुम वगैरे.सार्वजनिक रस्त्यावर ठेवु नये. व रहदारीला अडथळा करु नये.
६. दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद शहर विकास आराखडाप्रमाणे रेषा लाईनमध्ये जाणारा भाग सोडुनच बांधकाम केले पाहिजे.
७. इमारतीचे बांधकम पुर्ण झाल्यानंतर रितसर अर्ज व नकाशे सादर करुन बांधकाम पूर्ण झाल्याचे भोगवटा प्रमाणपत्र घेऊन मगच इमारतीची वापर सुरु करावा. तसेच महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ कलम १९३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये पूर्ण परवानगी शिवाय इमारतीची वापर करणेस सक्त मनाई आहे.
८. सदर मिळकतीची नोंद नगरपरिषदेच्या प्रॉपर्टी रजिस्टरमध्ये केली पाहिजे. न केल्यास तो कायदा प्रमाणे गुन्हा आहे.
९. ज्याठिकाणी नगरपरिषदेचा नळ पाणी पुरवठा उपलब्ध आहे. तेथे पाणी बांधकामाचे मुदतीत नगरपरिषदेची रितसर परवानगी घेऊन वापरता येईल. मात्र बांधकामाचे मुदतीत नगरपरिषद ठरविल त्या प्रमाणे बांधकामाकरिता वापरावयाच्या पाण्याचे बिल आगाऊ द्यावे लागेल.
१०. प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १७४६=५० चौ.मी.आहे व बांधकाम परवानगी ५८२=१६ चौ.मि. अनुज्ञेय आहे. तळमजला ५८१=८० चौ.मि. व पहिला मजला ५८१=८० चौ.मी. क्षेत्रास
बेदखल ५८१=८० चौ.मी. + दुसरा मजला ५८१=८० चौ.मी. क्षेत्रास
परवानगी दिलेली आहे.

Scanned by CamScanner

११. सांडपाण्याचे गटार व सेप्टीक संडासाचे पाणी याचे विल्हेवाट स्वतःचे प्लॉटमध्ये शोषखड्डा खोदुन केली पाहिजे. किंवा गटार अस्तित्वात असल्यास त्यात सोडले पाहिजे.

१२. बांधकामासाठी लागणारे साहित्य चांगल्या दर्जाचे व प्रतिचे असावे.

१३. नगरपरिषदेचे अधिकृत परवानाधारक अभियंता/पर्यवेक्षक यांचे देखरेखीखाली बांधकाम करावे.

१४. शेजारील जमीन अगर घरकामाचे सार्वजनिक मालमत्तेत वहिवाटीचे हक्कास अगर हितसंबंधास बाधा येता कामा नये.

१५. इमारती सभोवतालच्या जागेत कमीत कमी पाच झाडे लावावीत.

१६. मंजुर नकाशापेक्षा जादा बांधकाम केल्यास ते अतिक्रमण समजण्यांत येईल व नगरपालिका नियमानुसार तो गुन्हा समजून कारवाई केली जाईल.

१७. राहण्याचे जागेचा गोदाम, वखार, धर्मशाळा, कारखाना तबेला किंवा गॅरेज म्हणून वापर करता कामा नये. तसेच ज्वालाग्रही पदार्थासाठी म्हणुन करता येणार नाही.

१८. बांधकामाचा पाया हार्डस्ट्रटा पर्यंत घ्यावा.

१९. जो त्याची उंची इमारती समोरील रस्त्याचे सेंटरच्या लेव्हल पेक्षा कमीतकमी २ फुट उंच असावी.

२०. घराकरिता सेप्टीक संडासाची टाकी पाहिजे.

२१. कामाच्या ठिकाणी एक फलक लावावा. त्यात मालकांचे नांव, कंत्राटदाराचे व सुपरवायझर यांचे नांव व पत्ता नमुद करावा तसेच मंजुर बांधकामाचे क्षेत्र गट क्र./सि.स.क्र./प्लॉटक्र. इत्यादी नमुद करावे. त्याचप्रमाणे नगरपरिषदने मंजुर केलेला नकाशा ज्याठिकाणी पाहणीसाठी उपलब्ध होऊ शकेल त्या जागेचा पत्ता ही लिहावा.

२२. नियोजित बांधकाम हे भुकंप रोधक करण्याचे दृष्टीने सक्षम स्थापत्य अभियंत्याकडुन त्याचे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे नकाशे व डिझाईन प्राप्त करुन त्यातुनच स्थापत्य अभियंत्याच्या देखरेखखाली बांधकाम पूर्ण करावे.

२३. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला नगरपरिषदेकडे सादर करतांना त्यासोबत झालेले बांधकाम हे भुकंप रोधक तरतुदीनंतर झाले. असल्याबाबतच्या सक्षम स्थापत्य अभियंत्यांचा दाखला सादर करावा व बांधकाम पवरवागीनुसारच बांधकाम केल्याचा दाखला सादर करावा.

२४. म्युनिसिपल टाऊन प्लॅनिंग नियमाचे व बिल्डींग बॉयलॉजचे उल्लंघन होणार नाही. ह्या शर्तीवर प्लॅन मंजुर करण्यात येत आहे.

२५. सौर उर्जेवर पाणी गरम करावयाच्या संयंत्राच्या वापर करणे नगरपालिका क्षेत्रात बंधनकारक आहे.याची नोंद घ्यावी.

२६. पावसाळ्याचे पावसाचे पाणी साठविणेबाबत जलपुनर्भरणाच्या नियमांची पुर्तता केल्याशिवाय वापर प्रमाणपत्र देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२७. यापुर्वी जा.क्रं. १६३, दि. १०/०१/२००३ अन्वये देणेत आलेली बांधकाम परवानगी याव्दारे निष्प्रभावित करणेत येत आहे.

वरीलपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास तो गुन्हा समजण्यांत येईल व दिलेली परवानगी रद्द करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सदर
शाखा/२४३७
२००५

मुख्याधिकारी
दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद, दोंडाईचा
जि.धुळे

बांधकाम परवानगी व नकाशाची एक प्रत पुढील कार्यवाही सादर :
अ) कर निर्धारण विभाग दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद

Scanned by CamScanner